दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

## ठाण्यात अवयवदान जनजागृतीपर रॅलीचे आयोजन

ठाणे(९): मरणोत्तर अवयदानामुळे अन्य कोणीतरी हे सुंदर जग पाहू शकेल, ही संकल्पना जनमानसात रुजविण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय यांच्यावतीने दिनांक ११ सप्टेंबर २०१८ रोजी दुपारी २.०० वाजता अवयवदानाच्या जनजागृतीपर रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल येथून या रॅलीला सुरुवात होणार आहे. पुढे कळवा प्रभाग समिती-घड्याळ चौक-कळवा मेडिकल-कळवा मार्केट रोड–संदेश स्वीट लेन-जुना मुंबई पुणे रोड-कळवा नाका या मार्गे छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल येथे या रॅलीची सांगता होणार आहे.

अवयवदानाबाबत समाजामध्ये अनेक समज गैरसमज आहेत. गेल्या दोन ते तीन वर्षापासून अवयवदान चळवळीबाबत लोकांमध्ये जनजागृती होत आहे.ठाणे शहरातील नागरिकांमध्येही व्यापक प्रमाणात जागृती होण्याकरिता या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी या जनजागृतीपर रॅलीमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन ठाणे महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.